**गायवळ (सं.) लघु पाटबंधारे योजना**
**ता. कारंजा जि. वाशिम**
**योजनेस द्वितीय सुधारीत प्रशासकीय**
**मान्यता प्रदान करणेबाबत.**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक: ९८ विपाविम/कातां ७(१)/ गायवळ(सं.)लपायो/ व्दितीय सुप्रमा/(धा.क्र. २८/२०१८)/ २०१८, दि. १४/०१/२०१९**

**पहावे :-** १.शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र. संकिर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ९.९.२०१५.
२.विपाविम नियामक मंडळाचे ७१ व्या बैठकीतील ठराव क्र. ७१/५

**प्रस्तावाना :**

गायवळ (सं.) ल. पा. योजना ता. कारंजा जि. वाशिम या योजनेस विपाविम निर्णय क्र. विपाविम/कातां ६/ ३६३ / २००९ / गायवळ / प्रमा/(३९/२००८) दि. २१.८.२००८ अन्वये रू. ६३२.०० लक्ष (रू. सहा कोटी बत्तीस लक्ष फक्त) इतक्या किंमतीस (दरसुची २००७-०८ वर आधारीत) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

प्रकल्पास शासन निर्णय क्र. लपायो -२२१३/(७७/२०१३)/लपा-२, दि. ३.६.२०१५ अन्वये रू. १२१०.०० लक्ष (रू. बारा कोटी दहा लक्ष, फक्त) इतक्या किंमतीस (दरसुची २००९-१० वर आधारीत) प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, जास्त दराच्या निविदा स्विकृतीमुळे वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, संकल्पनातील बदल , इतर कारणे व अनुषंगिक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावात किंमत प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे व सदर प्रकल्प मा. राज्यपाल महोदयांच्या सिंचन अनुशेष निर्मुलन कार्यक्रमा अंतर्गत असल्याने व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे .

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये वाशिम जिल्ह्यातील गायवळ (सं.) लघु पाटबंधारे योजना, ता.कारंजा जि. वाशिम या योजनेच्या एकूण अंदाजित खर्च रू. २६९४.१० लक्ष (रू. सव्वीस कोटी, चौ-याण्णव लक्ष दहा हजार फक्त) किंमतीस व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. २५७९.३० लक्ष (रू. पंचवीस कोटी एकोणऐंशी लक्ष तीस हजार फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. ११४.८० लक्ष (रू. एक कोटी चौदा लक्ष ऐंशी हजार फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१६-१७ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

ठळक बाबी –

| | |
|---|---|
| **अ) योजनेचे सिंचन क्षेत्र** | **- ३३७ हेक्टर** |
| **ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा** | **- २.०३ द.ल.घ.मी. (२०३० स.घ.मी.)** |
| **क) प्रति स.घ.मी. पाणीसाठा किंमत** | **- रू. १३२०००/-(मापदंड रू.९५७९० x ९०%=८६२११/- प्रती स.घ.मी.) प्रकल्प मापदंडात बसत नाही.** |
| **ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर** | **- ०.५२ (मापदंड १.०० पेक्षा जास्त) प्रकल्प मापदंडात बसत नाही.** |